# नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी)

## सभा क्र. १५

- वार :- शनिवार
- दिनांक :- २३.०८.२०२५
- वेळ :- दुपारी ०४.०० वाजता
- स्थळ :- कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा

# विषयावरील ठराव

# (इतिवृतांत)

**कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा**
सदर बझार, आर.टी.ओ. ऑफिस जवळ, सातारा
फोन नं. ०२१६२-२३०६३६, २३३००५
ईमेल - office@kbpcoes.edu.in
वेबसाईट - www.kbpcoes.edu.in

Scanned with CamScanner

# कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा

*नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) सभा क्र १५. दि. २३.०८.२०२५ इतिवृतांत*

जा. क्र. ग.ब.स./सभा १५/२०२५/ दि. - २३.०८.२०२५

**नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) सभा क्र. १५**

**दिनांक - २३.०८.२०२५**

**वेळ - दुपारी ०४.०० वाजता**

**स्थळ - कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा**

या महाविद्यालयाची नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) ची १५ वी सभा **शनिवार दि. २३.०८.२०२५ रोजी दुपारी ०४.०० वाजता** मा. ना. दिलीप वळसे पाटील साहेब - चेअरमन नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) यांचे अध्यक्षतेखाली ऑफलाईन सभा आयोजित केलेली आहे. तरी सर्व सन्माननीय सदस्यांनी सभेस उपस्थित राहून मार्गदर्शन करावे, ही विनंती.

**विषय – पत्रिका**

| विषय | विषय | पान क्र. |
|---|---|---|
| विषय क्र. १ | मागील नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) सभा क्र १४. दि. १०.०६.२०२५ रोजीच्या सभेचे इतिवृत्तांत वाचून कायम करणे व घेतलेल्या निर्णयाची माहिती देणे. | ०१ |
| विषय क्र. २ | महाविद्यालयातील Center of Excellence करिता CSR Fund मधून एक कोटी रुपये इतकी रक्कम मिळवून दिलेबद्दल मा. प्रतापराव पवार यांचे आभार व रयत शिक्षण संस्थेमार्फत २५ लाख रक्कम दिल्याबाबत आभार ठराव. | ०२ |
| विषय क्र. ३ | शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून AI & DS या विभागातील विद्यार्थ्यांची संख्या १२० करणेबाबत व नवीन एम. टेक कोर्स कॉम्प्युटर सायन्स अॅन्ड इंजिनिअरिंग व सिव्हील इंजिनिअरिंग या विभागामध्ये Construction Management हा पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु करणेबाबत चर्चा करणे. | ०३-०४ |
| विषय क्र. ४ | **महाविद्यालयातील कामकाजाबाबतची माहिती देणे.**<br>• प्रथम वर्ष व थेट द्वितीय वर्षात प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांची माहिती देणे<br>• Center of Excellence बाबतची माहिती देणे.<br>• स्थानिक व्यवस्थापन समिती (LMC) बाबत माहिती देणे<br>• महाविद्यालयात सुरु असलेल्या बांधकाम व नवीन साहित्य खरेदी बाबत माहिती देणे.<br>• अभिनव इंजिनिअरिंग कॉलेज येथील स्थलांतरीत विद्यार्थ्यांची माहिती देणे. | ०५-०९ |
| विषय क्र. ५ | महाविद्यालयामध्ये नवीन स्वतंत्र ग्रंथालयासाठी इमारत बांधण्यासाठी चर्चा करणे. | १० |
| विषय क्र. ६ | **महाविद्यालयातील सेवकांनी सादर केलेल्या विविध अर्जाबाबत चर्चा करणे.**<br>१. Smartgencon 2025 Conference साठी महाविद्यालयातील तीन शिक्षक सेवकांना बाली येथे उपस्थित राहण्यासाठी येणाऱ्या प्रवासखर्चास परवानगी मिळणेसाठी सादर केलेल्या अर्जाबाबत मंजुरी घेणे.<br>२. सिव्हील इंजिनिअरिंग या विभागातील विद्यार्थ्यांची दुबई येथे शैक्षणिक सहल काढण्यास परवानगी घेणे.<br>३. Center of Excellence या सेंटर मध्ये सी. एन. सी. ट्रेनर घेणेबाबत. | ११-१२ |

Scanned with CamScanner

# कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा

*नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) सभा क्र १५. दि. २३.०८.२०२५ इतिवृतांत*


| | | |
|---|---|---|
| **विषय क्र. ७** | **महाविद्यालयातील आर्थिक बाबींची मंजुरी घेणे.** | १२ |
| विषय क्र. ७.१ | महाविद्यालयाच्या मुलांच्या व मुलींच्या वसतिगृहाच्या इमारतीची दुरूस्ती व कलरचे कामकाज करणेबाबत व प्राचार्य बंगलाचे नूतनीकरणाबाबत चर्चा करणे. | १२-१३ |
| विषय क्र. ७.२ | Research Policy बाबत चर्चा करून मान्यता घेणे. | १३-१४ |
| विषय क्र. ७.३ | Electrical Vehicle लॅब ची स्थापना करण्यासाठी चर्चा करणे व मंजुरी घेणे. | १४ |
| विषय क्र. ७.४ | शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील शिक्षक व शिक्षकेत्तर सेवकांच्या पगारास व मानधनास परवानगी घेणेबाबत. | १५ |
| विषय क्र. ७.५ | संस्था डीलर कडून महाविद्यालयात सोलार पॅनल बसविण्यास व येणाऱ्या खर्चास परवानगी मिळणेबाबत. | १६ |
| विषय क्र. ७.६ | EduSkills Connect मार्फत आयोजित केलेल्या Eduskill Connect 2025 & Eduskill HR Summit साठी उपस्थित राहण्यासाठी येणाऱ्या खर्चास परवानगी मिळणे बाबत. | १७ |
| विषय क्र. ७.७ | कु. प्रथा देवकर हिची शैक्षणिक फी माफ होणेबाबत आलेल्या अर्जाबाबत चर्चा करणे. | १७-१८ |
| विषय क्र. ८ | महाविद्यालयातील शिक्षकेत्तर सेवकांना अकरा महिन्याचे नेमणूक आदेश देण्याबाबत चर्चा करणे. | १८-१९ |
| **विषय क्र. ९** | **मा. चेअरमन यांचे परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयावर चर्चा करणे.** | २० |
| विषय क्र. ९.१. | VEETRAG Computers Pvt. Ltd. यांच्या कडून प्राप्त झालेल्या बिलाची रक्कम अदा करण्यास परवानगी मिळणेबाबत. | २० |
| विषय क्र. ९.२. | दिल्ली येथे आयोजित केलेल्या Conference साठी सिव्हील विभागातील पाच विद्यार्थ्यांची रजिस्ट्रेशन फी अदा करण्यास परवानगी घेणे. | २०-२१ |
| विषय क्र. ९.३ | श्री. पडवळ संदेश बळीराम लेखापाल यांच्या मागील संस्थेतील वेतनश्रेणी संरक्षित करून लागू करणेस परवानगी मिळणेबाबत. | २१-२२ |


**प्राचार्य तथा सचिव**
नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी)
कर्मवीर भाऊराव पाटील
अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा

Scanned with CamScanner

# कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा

*नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) सभा क्र १५. दि. २३.०८.२०२५ इतिवृतांत*

**जा. क्र. ग.ब.स./सभा १५/२०२५/** **दि. - २३.०८.२०२५**

**नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) सभा क्र. १५**

**दिनांक - २३.०८.२०२५**

**वेळ - दुपारी ०४.०० वाजता**

**स्थळ - कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा**

कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय सातारा या महाविद्यालयाची नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) ची १५ वी सभा **शनिवार दि. २३.०८.२०२५ रोजी दुपारी ०४.०० वाजता** मा. ना. दिलीप वळसे पाटील साहेब - चेअरमन नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) यांचे अध्यक्षपदी ऑनलाईन / ऑफलाईन संपन्न झाली. या सभेस खालील मान्यवर उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य –**

| अ.क्र. | सदस्य नाव | पद |
|---|---|---|
| १. | मा. ना. दिलीप वळसे - पाटील साहेब | चेअरमन |
| २. | मा. चंद्रकांत दळवी साहेब IAS (Retd.)<br>चेअरमन, रयत शिक्षण संस्था, सातारा | निमंत्रित |
| ३. | मा. विकास देशमुख साहेब IAS (Retd.)<br>सचिव, रयत शिक्षण संस्था, सातारा | सदस्य |
| ४. | मा. प्रतापराव पवार | सदस्य |
| ५. | मा. डॉ. एन. बी. पासलकर | सदस्य |
| ६. | डॉ. सौ. एस. जे. मोदी | सदस्य |
| ७. | डॉ. सौ. एस. व्ही. माने | सदस्य |
| ८. | प्रा. डॉ. ए. सी. अत्तार | सदस्य / सचिव |

सर्वप्रथम सभेचे सदस्य सचिव तथा मा. प्राचार्य यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत केले तसेच जे सन्मानीय सदस्य सभेस गैरहजर आहेत त्यांची रजा मंजूर करण्यात करून मा. ना. दिलीप वळसे पाटील साहेब महाविद्यालयाचे नियामक मंडळाचे चेअरमन यांच्या अध्यक्षतेखाली सभेच्या कामकाजास सुरुवात झाली.

Scanned with CamScanner

## विषयावरील ठराव

**विषय क्र. १. :- मागील नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) सभा क्र १४. दि. १०.०६.२०२५ रोजीच्या सभेचे इतिवृत्तांत वाचून कायम करणे व घेतलेल्या निर्णयाची माहिती देणे.**

**टाचण** :- मागील नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) सभा क्र. १४, दि. १०.०६.२०२५ रोजीच्या इतिवृत्तांचे अवलोकन करून तो मंजूर करणेत यावा अशी विनंती आहे. तसेच मागील नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) सभा क्र. १४, दि. १०.०६.२०२५ मध्ये घेण्यात आलेल्या निर्णयावरील कार्यवाही ठरावाअनुक्रमे खालील प्रमाणे आहे.

| ठराव | निर्णय | निर्णयावरील कारवाई |
|---|---|---|
| ठराव क्र.०१ | मागील नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) सभा क्र. १३ दि. ०५.०४.२०२५ रोजीच्या सभेचे इतिवृत्तांत वाचून कायम करणे व घेतलेल्या निर्णयाची माहिती देणे. | मागील सभेचा इतिवृत्तात वाचून सर्व सहमतिने कायम करणेत आला. |
| ठराव क्र.०२ | महाविद्यालयातील Center of Excellence स्थापन करणेसाठी SimuSoft Technologies, Pune यांच्याकडून प्राप्त झालेल्या बिलाबाबत मार्गदर्शन मिळणेबाबत. | याबाबत सभेने चर्चा करून पुरवठा केलेल्या साहित्यांची खातरजमा करून टप्याटप्याने बिलाची रक्कम अदा करावी असे सभेने सुचविले, त्यानुसार प्राप्त झालेल्या बिलाची रक्कम टप्याटप्याने देण्यात आली आहे. |
| ठराव क्र.०३ | AICTE Sponsored International conference साठी Video Conference करिता लागणाऱ्या साहित्य (Equipment) खरेदी करण्याची परवानगी मिळणेबाबत. | सदर International conference करिता संस्थेने ठरविण्यात आलेल्या विक्रेता कडून तांत्रिक उपकरणे खरेदी करण्यात आली. |
| ठराव क्र.०४ | **मा. चेअरमन यांचे परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयावर चर्चा करणे.** | -- |

**वरील नुसार मागील नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) सभा क्र. १४ मधील सर्व ठराव मा. प्राचार्य यांनी सभेस सांगितले व सभेने चर्चा करून अवलोकन केले.**

**सूचक :- डॉ. सौ. माने एस. व्ही.**
**अनुमोदक :- मा. प्रतापराव पवार**
**ठराव सर्वानुमते मंजूर**



Scanned with CamScanner

# कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा

*नियामक मंडळ (गव्हर्निंग बॉडी) सभा क्र १५. दि. २३.०८.२०२५ इतिवृतांत*

**विषय क्र :- ०२. महाविद्यालयातील Center of Excellence करिता CSR Fund मधून एक कोटी रुपये इतकी रक्कम मिळवून दिलेबद्दल मा. प्रतापराव पवार यांचे आभार व रयत शिक्षण संस्थेमार्फत २५ लाख रक्कम दिल्याबाबत आभार ठराव.**

**टाचण** – महाविद्यालयातील Center of Excellence स्थापन करणेसाठी मागील महाविद्यालय नियामक मंडळाच्या सभेमध्ये ठरल्याप्रमाणे Center of Excellence ची उभारणी करण्यात आली. सदर सेंटर करिता नियामक मंडळाचे सदस्य मा. प्रतापराव पवार यांनी CSR Fund मधून खालील प्रमाणे रक्कम उपलब्ध करून दिली.

| | |
|---|---|
| १.मा. प्रतापराव पवार | - १० लाख |
| २.Infra Solution Pvt. Ltd. | - ४० लाख |
| ३. Finolex Cable Pune | - ५० लाख |
| **एकूण रक्कम** | **- एक कोटी रुपये** |

वरील प्रमाणे महाविद्यालयातील Center of Excellence च्या उभारणे करिता मा. प्रतापराव पवार यांच्या प्रयत्नातून रक्कम मिळाली त्याबद्दल त्याचे हि सभा आभार व्यक्त करते व Finolex Cable Pune कंपनीचे मा. रमेश ललवाणी साहेब यांचे आभार..

तसेच रयत शिक्षण संस्था, सातारा यांच्यामार्फत २५ लाख रुपये Center of Excellence च्या उभारणी करिता देण्यात आले आहेत. याबद्दल मा. चंद्रकांत दळवी, चेअरमन, मा. भगीरथकाका शिंदे व्हा. चेअरमन, मा. विकास देशमुख, सचिव, रयत शिक्षण संस्था सातारा व सर्व संस्था पदाधिकारी यांचे आभार.

**ठराव** - याबाबत सभेने चर्चा करून मा. प्रतापराव पवार साहेब, Infra Solution Pvt. Ltd., Finolex Cable, Pune व रयत शिक्षण संस्थेचे मा. चेअरमन, मा. सचिव व सर्व सन्मानीय अधिकारी व पदाधिकारी यांचे आभार मानले.



Scanned with CamScanner

# कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा

*नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) सभा क्र १५. दि. २३.०८.२०२५ इतिवृतांत*

**विषय क्र :-** ०३. शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून AI & DS या विभागातील विद्यार्थ्यांची संख्या १२० करणेबाबत व नवीन एम. टेक कोर्स कॉम्प्युटर सायन्स अॅन्ड इंजिनिअरिंग व सिव्हील इंजिनिअरिंग या विभागामध्ये Construction Management हा पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु करणेबाबत चर्चा करणे.

**टाचन** :-. महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून Artificial Intelligence & Data Science हि नवीन विद्याशाखा सुरु करण्यात आलेली आहे. सदर विद्याशाखेची प्रवेश क्षमता हि ६० असून शैक्षणिक वर्ष २०२४-२५ व शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये पूर्णपणे विद्यार्थ्यांचे प्रवेश झालेले आहेत व या विद्याशाखेत प्रवेश घेण्यासाठी अनेक विद्यार्थी मागणी करीत असतात. भविष्यात Artificial Intelligence & Data Science या विद्याशाखेची मागणी वाढणार आहे त्यामुळे या विद्याशाखेची प्रवेश क्षमता ६० वरून १२० करणे विद्यार्थ्यांच्या व महाविद्यालयाच्या हिताच्या दृष्टीने उपयोगी ठरेल.

तसेच कॉम्प्युटर सायन्स अॅन्ड इंजिनिअरिंग, Artificial Intelligence & Data Science व या सक्षम विद्याशाखांना शिकविण्यासाठी एम.टेक कॉम्प्युटर सायन्स अॅन्ड इंजिनिअरिंग या शैक्षणिक पात्रतेची आवश्यकता असते, परंतु हि शैक्षणिक पात्रता असणारे शिक्षक उपलब्ध होत नाहीत व एम.टेक कॉम्प्युटर सायन्स अॅन्ड इंजिनिअरिंग हे शिक्षण देणाऱ्या शिक्षण संस्था फार कमी असल्यामुळे आपल्या महाविद्यालयामध्ये एम.टेक कॉम्प्युटर सायन्स अॅन्ड इंजिनिअरिंग हि विद्याशाखा सुरु करणे उपयुक्त ठरेल.

याच बरोबर एम.टेक सिव्हील Construction Management या विद्याशाखेस देखील भरपूर मागणी आहे व महाविद्यालयाच्या सिव्हील इंजिनिअरिंग विभागाच्या विभागप्रमुखांनी वरील पदव्युत्तर अभ्यास सुरु करण्यासाठी अर्ज सादर केलेला आहे. सदर विद्याशाखेसाठी विद्यार्थ्यांची मागणी असल्याने महाविद्यालयामध्ये एम.टेक सिव्हील Construction Management हि विद्याशाखा सुरु करणे उपयुक्त ठरेल.

**आर्थिक तरतूद** :-

१. Artificial Intelligence & Data Science या विद्याशाखेत ६० विद्यार्थी प्रवेश क्षमता वाढल्यास एकूण ११ शिक्षक व २ शिक्षकेत्तर सेवक नियुक्त करावे लागतील. यासाठी अंदाजे प्रती महिना ६,००,०००/- तसेच वार्षिक ७२,००,०००/-इतका खर्च येईल. या विद्याशाखेत चारही वर्षाचे प्रत्येकी ६० प्रवेश होतील व थेट द्वितीय वर्षातील १८ विद्यार्थी संख्या गृहीत धरल्यास एकूण चार वर्षाची विद्यार्थी संख्या २५८ इतकी होईल. सध्या महाविद्यालयाची फी १,२६,५००/- इतकी असून या फी नुसार अंदाजे ३,२६,३७,०००/- इतके वाढीव उत्पन्न महाविद्यालयास प्राप्त होईल.

२. एम.टेक कॉम्प्युटर सायन्स अॅन्ड इंजिनिअरिंग व एम. टेक सिव्हील Construction Management या दोन्ही विद्याशाखेमध्ये दोन्ही वर्षामधील मिळून एकूण ७२ विद्यार्थी प्रवेश घेतील व यातून ३८,८८,०००/- इतके उत्पन्न प्राप्त होईल. या दोन्ही विद्याशाखेस शिकविण्यासाठी ४ शिक्षकांची आवश्यक आहे व त्यासाठी वार्षिक २४,००,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.



Scanned with CamScanner

# कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा



**प्राचार्य शिफारस** :- वरील सर्व बाबींचा विचार करता महाविद्यालयामध्ये Artificial Intelligence & Data Science या विद्याशाखेत ६० विद्यार्थी प्रवेश क्षमता वाढविणे व एम.टेक कॉम्प्युटर सायन्स ॲन्ड इंजिनिअरिंग व एम. टेक सिव्हील Construction Management या दोन्ही विद्याशाखा सुरु करण्यात याव्यात.

**ठराव** :- सभेने चर्चा करून शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून AI & DS या विभागातील विद्यार्थ्यांची संख्या १२० करणेबाबत व कॉम्प्युटर सायन्स ॲन्ड इंजिनिअरिंग या विभागाचे एम.टेक कोर्स सुरु करण्यास व सिव्हील इंजिनिअरिंग या विभागामध्ये Construction Management हा पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु करण्यास सभेने परवानगी दिली.

तसेच शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून AI & DS या विभागातील विद्यार्थ्यांची संख्या १२० करणेबाबत व कॉम्प्युटर सायन्स ॲन्ड इंजिनिअरिंग व सिव्हील इंजिनिअरिंग या विभागामध्ये Construction Management हा पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी लागणारी फी अदा करण्यास सभेने मान्यता दिली व त्यासाठी लागणारी कार्यवाही पूर्ण करावी असे सूचित केले.

**सूचक** :- **डॉ. सौ. मोदी शविना जे.**
**अनुमोदक** :- **मा. प्रतापराव पवार**
**ठराव सर्वानुमते मंजूर**

पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय सातारा



Scanned with CamScanner

**विषय क्र :- ०४. महाविद्यालयातील कामकाजाबाबतची माहिती देणे.**

- **प्रथम वर्ष व थेट द्वितीय वर्षात प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांची माहिती देणे**

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील प्रथम वर्ष, थेट द्वितीय वर्ष प्रवेश प्रक्रिया दि. ०१.०८.२०२५ पासून सुरु झालेली आहे. यामध्ये खालील तक्त्यानुसार महाविद्यालयातील विविध विभागात विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतलेला आहे.

**शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांच्या प्रवेश संख्येबाबत**

| अ.क्र | विभागाचे नाव | प्रथम वर्ष प्रवेश क्षमता | प्रवेशित विद्यार्थी संख्या | थेट द्वितीय वर्ष प्रवेश क्षमता | प्रवेशित विद्यार्थी संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १. | सिव्हील इंजिनिअरिंग | ६०+९ | ३८ | ६+४ | ४ |
| २. | मेकॅनिकल इंजिनिअरिंग | ६०+९ | ३५ | ६+१ | २ |
| ३. | कॉम्प्युटर सायन्स ॲण्ड इंजिनिअरिंग | १८०+२७ | १०८ | १८+१ | १६ |
| ४. | इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड टेलीकॅम्युनिकेशन इंजिनिअरिंग | ६०+९ | ३६ | ६+४ | ७ |
| ५. | आर्टिफिशियल इंटेलिजन्स ॲण्ड डेटा सायन्स | ६०+९ | ४९ | ६+१ | ३ |
| | **एकूण प्रवेशित विद्यार्थी** | ४२०+६३ | २८६ | ४२+११ | ३२ |
| | | ४८३ | | ५३ | |

वरील तक्त्यातील विद्यार्थी संख्या हि प्रथम वर्षातील CAP Round I व Cap Round II मध्ये प्रवेशित झालेली विद्यार्थी संख्या असून अजून दोन CAP Round शिल्लक आहेत. तसेच थेट द्वितीय वर्षातील देखील Cap Round II झाले असून दोन CAP Round शिल्लक आहेत

**ठराव** - याबाबत सभेने अवलोकन करून महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२५-२६ च्या प्रथम वर्ष व थेट द्वितीय वर्ष प्रवेश झालेल्या विद्यार्थ्यांच्या माहितीचे सभेने आवलोकन केले.

- **Center of Excellence बाबतची माहिती देणे.**

महाविद्यालयात Center of Excellence in AI IoT, Robotics & Automation ची स्थापना करण्यात आली आहे. सदर Center of Excellence चे उद्घाटन मा. खा. शरदचंद्र पवार साहेब, अध्यक्ष, रयत शिक्षण संस्था, सातारा यांच्या शुभहस्ते दि. २६.०६.२०२५ रोजी झाले. उद्घाटन प्रसंगी मा. चंद्रकांत दळवी IAS (Retd.) चेअरमन, रयत शिक्षण संस्था, सातारा, मा. प्रतापराव पवार सदस्य, महाविद्यालय नियामक मंडळ, फिनोलेक्स कंपनीचे मा. रमेश ललवाणी साहेब, मा. विकास देशमुख IAS (Retd.). मा. प्रिं. डॉ. शिवलिंग मेनकुदळे सहसचिव (उ.शि), मा. प्रिं. डॉ. राजेद्र मोरे सहसचिव (ऑडीट), मा. बंडू पवार सहसचिव (माध्य.शिक्षण), मा. डॉ. ज्ञानदेव म्हस्के, कुलगुरू, कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठ, सातारा, श्री. सुनील चौरे SimuSoft Tecchnologies Pvt. Ltd., Pune तसेच संस्थेचे सन्मानीय आजी माजी मॅनेजिंग कौन्सिल सदस्य, शाखाप्रमुख, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. सी. अत्तार, महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर सेवक व विद्यार्थी उपस्थित होते.



Scanned with CamScanner

# कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा

*नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) सभा क्र १५. दि. २३.०८.२०२५ इतिवृतांत*

सध्या SimuSoft Tecchnologies Pvt. Ltd., Pune यांच्याकडून महाविद्यालयातील तीन शिक्षक सेवकांना ट्रेनिंग देण्यात आलेले आहे. महाविद्यालयामार्फत विद्यार्थ्यांना Internship देण्याकरिता अभ्यासक्रम देण्याचे कामकाज सुरु आहे.





**ठराव** - रयत शिक्षण संस्थेमार्फत महाविद्यालयात स्थापन केलेल्या Center of Excellence बाबत सभेस माहिती दिली. त्याबाबत सभेने चर्चा करून विद्यार्थ्यांना त्याचा कसा फायदा होईल याबाबत पुढील कार्यवाही करावी असे सूचित केले.



Scanned with CamScanner

❖ **स्थानिक व्यवस्थापन समिती (LMC) बाबत माहिती देणे.**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ लोणेरे, रायगड यांच्या निर्देशनानुसार महाविद्यालयात स्थानिक व्यवस्थापन समिती (LMC) असणे आवश्यक आहे. त्यानुसार महाविद्यालयात स्थानिक व्यवस्थापन समिती (LMC) स्थापन करण्यासाठी निवडणूक अधिकारी यांची नेमणूक करून त्यांच्या मार्फत तीन शिक्षक व एक शिक्षकेत्तर सेवकांची नेमणूक करण्यासाठी प्रक्रिया राबविण्यात आली. यामध्ये तीन शिक्षक सेवकांची निवड झाली असून एक शिक्षकेत्तर सेवकाची निवड हि निवडणूक प्रक्रिया द्वारे पूर्ण झालेली आहे. खालील नुसार शिक्षक व शिक्षकेत्तर सेवकांची निवड झालेली आहे.

शिक्षक सेवकांचे प्रतिनिधी - १. श्री. शेलार अजय बी. - सहाय्यक प्राध्यापक
२. श्री. दांगट गणेश डी. - सहाय्यक प्राध्यापक
३. श्री. पाटील शरदचंद्र एस. - सहाय्यक प्राध्यापक
शिक्षकेत्तर सेवकांचा प्रातिनिध - १. श्री. गाडे जयवंत एम. - शिपाई

महाविद्यालयात स्थानिक व्यवस्थापन समिती (LMC) स्थापन करण्यासाठी महाविद्यालयाने खालील प्रमाणे समिती तयार करून संस्था कार्यालयास मान्यतेसाठी सादर केली आहे. सदरची बाब सभेस अवलोकनास सादर करीत आहे.

| अ.क्र. | नाव | | पद |
|---|---|---|---|
| १ | मा. दिलीप वळसे पाटील | संस्था प्रतिनिधी | चेअरमन |
| २ | मा. विकास देशमुख IAS (Retd.) | संस्था सचिव | सदस्य |
| ३ | मा. प्रतापराव पवार | उद्योजक | सदस्य |
| ४ | मा. उदय जाधव | उद्योजक माजी विद्यार्थी | सदस्य |
| ५ | डॉ. सुनिल माने | शिक्षण तज्ञ | सदस्य |
| ६ | श्री. शेलार अजय बाबुराव | शिक्षक प्रतिनिधी | सदस्य |
| ७ | श्री. दांगट गणेश धोंडू | शिक्षक प्रतिनिधी | सदस्य |
| ८ | श्री. पाटील शरदचंद्र श्रीकांत | शिक्षक प्रतिनिधी | सदस्य |
| ९ | श्री. गाडे जयवंत मुगुटराव | शिक्षकेत्तर प्रतिनिधी | सदस्य |
| १० | मा. डॉ. एन. बी. पासलकर | व्यवस्थापन प्रतिनिधी | सदस्य |
| ११ | डॉ. ए. सी. अत्तार | शाखाप्रमुख | सदस्य / सचिव |

**ठराव** - वरील प्रमाणे महाविद्यालयातील स्थानिक व्यवस्थापन समिती (LMC) मध्ये शिक्षक व शिक्षकेत्तर सेवकांच्या निवडीबाबत सभेस माहिती दिली. तसेच गठीत करण्यात आलेल्या स्थानिक व्यवस्थापन समिती (LMC) बाबत सभेने चर्चा करून अवलोकन करून सदर समितीची संस्था मान्यता घेऊन पुढील योग्य ती कार्यवाही करावी असे सूचित केले.



Scanned with CamScanner

# कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा

*नियामक मंडळ (गव्हर्निंग बॉडी) सभा क्र १५. दि. २३.०८.२०२५ इतिवृतांत*

❖ **महाविद्यालयात सुरु असलेल्या बांधकाम व नवीन साहित्य खरेदी बाबत माहिती देणे.**

महाविद्यालयात पुढील तीन ते चार महिन्यात Second NAAC कमिटीची भेट होणार आहे. त्याअनुषंगाने महाविद्यालयात सुसज्य IQAC ऑफिस असणे आवश्यक आहे. तसेच महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे प्लेसमेंट करण्यासाठी विविध कंपनी महाविद्यालयात भेट देऊन विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेत असतात त्यासाठी महाविद्यालयात IQAC office & TPO Interview Cabins Renovation चे नूतनीकरण करण्यासाठी संस्थेस अंदाजपत्रक देऊन संस्था इमारत बांधकाम विभागाकडून मंजुरी घेण्यात आलेली आहे. त्यानुसार टेंडर मागविण्यात आले असून दि. १६.०८.२०२५ रोजी महाविद्यालय खरेदी समिती मार्फत सभा घेण्यात आली होती. त्यानुसार महाविद्यालयात प्राप्त झालेल्या टेंडर यांच्याशी चर्चाकरून श्री. महेश कोकीळ बिल्डकॉन यांना सदरचे कामकाज देण्यात आलेले आहे सदर नूतनीकरणाचे कामकाज हे एकूण २२,००,०००/- किमतीचे आहे. तसेच महाविद्यालयात खालील तक्त्यातील साहित्यांचे टेंडर / कोटेशन मागवून नवीन साहित्य खरेदी करण्यात येणार आहे.

| अ.क्र. | साहित्याचे नाव | एकूण संख्या | एकूण खर्च |
|---|---|---|---|
| १ | Center Water Purifier | १ | ९,०००/- |
| २ | Genset (82 kv) | १ | ११,८०,०००/- |
| ३ | Water Cooler | ६ | २,७९,३००/- |
| ४ | Water Geyser (Boys & Girls Hostel) | ४ | ४८,०००/- |
| ५ | College Sack (Bags) | ५०० | २,००,०००/- |

वरील तक्त्यातील साहित्य महाविद्यालयात आवश्यक असल्याने सदर साहित्य खरेदी करणे आवश्यक आहे. तसेच सदर साहित्य खरेदी करण्यास महाविद्यालयाकडे आर्थिक तरतूद आहे.

**ठराव** - महाविद्यालयात सुरु असलेल्या बांधकाम व नवीन साहित्य खरेदी करण्याबाबत सभेस माहिती दिली. त्यानुसार सभेने चर्चा करून उक्त तक्त्यातील साहित्य खरेदी करण्यास परवानगी दिली.



Scanned with CamScanner

# कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा

*नियामक मंडळ (गव्हर्निंग बॉडी) सभा क्र १५. दि. २३.०८.२०२५ इतिवृतांत*

❖ **अभिनव इंजिनिअरिंग कॉलेज येथील स्थलांतरीत विद्यार्थ्यांची माहिती देणे.**

सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांच्याकडील सुचणेनुसार अभिनव एज्युकेशन सोसायटी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अॅन्ड टेक्नॉलॉजी, पुणे हे महाविद्यालय काही कारणास्तव बंद पडल्यामुळे सदर महाविद्यालयातील विद्यार्थी हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ लोणेरे या विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या विविध महाविद्यालयात ट्रान्सफर करण्यात आलेली आहेत. त्यामध्ये या महाविद्यालयात देखील खालील तक्त्याप्रमाणे विद्यार्थी ट्रान्सफर करण्यात आलेली आहेत. तसेच सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांच्या सुचणेनुसार जे विद्यार्थी थेट प्रवेशासाठी महाविद्यालयात येतील त्यांना प्रवेश देण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

| अ.क्र | विभागाचे नाव | वर्ग | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| | | Second Year | Third Year | Final Year | |
| १ | कॉम्प्युटर सायन्स अॅन्ड इंजिनिअरिंग | -- | ८ | ७ | १५ |
| २ | सिव्हील इंजिनिअरिंग | -- | -- | -- | -- |
| ३ | मेकॅनिकल इंजिनिअरिंग | -- | १ | -- | १ |
| ४ | इलेक्ट्रोनिकस अॅन्ड टेली. इंजिनिअरिंग | -- | -- | -- | -- |
| ५ | आर्टिफिशियल इंटेलिजन्स अॅण्ड डेटा सायन्स | १ | -- | -- | १ |
| **एकूण विद्यार्थी संख्या** | | १ | ९ | ७ | १७ |

वरील विद्यार्थी हे फी बाबत ते ज्या महाविद्यालयातून आलेले आहेत त्याच महाविद्यालयाची फी या महाविद्यालयाने आकारावी अशी विनंती करीत असतात तरी याबाबत सभेने योग्य ते मार्गदर्शन करावे.

**ठराव** :- अभिनव इंजिनिअरिंग कॉलेज येथील स्थलांतरीत विद्यार्थ्यांची माहिती सभेस दिली व त्यांच्या फी बाबत चर्चा करण्यात आली. सदर विद्यार्थ्यांची प्रवर्गाप्रमाणे फी घेण्यात यावी असे सभेने सुचविले.

**सूचक** :- **डॉ. सौ. माने एस. व्ही.**
**अनुमोदक** :- **मा. डॉ. एन. बी पासलकर**
**ठराव सर्वानुमते मंजूर**

पान नं.०९

Scanned with CamScanner

**विषय क्र :- ०५. महाविद्यालयामध्ये नवीन स्वतंत्र ग्रंथालयासाठी इमारत बांधण्यासाठी चर्चा करणे.**

**टाचन** :- महाविद्यालयामध्ये दरवर्षी विद्यार्थी संख्येमध्ये वाढ होत असल्याने महाविद्यालयास नवीन स्वतंत्र ग्रंथालयासाठी इमारत असणे आवश्यक आहे. महाविद्यालयात सध्या उपलब्ध असलेल्या जागेबाबत आर्किटेक्ट यांच्याशी चर्चा करून नवीन नियमानुसार FSI बाबत माहिती घेऊन उपलब्ध जागेमध्ये इमारत बांधता येईल का याबाबत चर्चा करण्यात आली असून उपलब्ध जागेमध्ये नवीन इमारत बांधकाम करता येईल. त्यासाठी अंदाजे रक्कम २ कोटी खर्च अपेक्षित आहे. सदर खर्चास सभेने मंजुरी द्यावी.

**आर्थिक तरतूद** :- महाविद्यालयात अद्यायुनिक नवीन स्वतंत्र ग्रंथालयासाठी इमारत बांधण्यासाठी आवश्यक जागा व लागणारी आर्थिक तरतूद महाविद्यालयाकडे उपलब्ध आहे.

**प्राचार्य शिफारस** :- महाविद्यालयामध्ये नवीन स्वतंत्र ग्रंथालयासाठी इमारत बांधण्यासाठी आर्किटेक्ट मार्फत आराखडा तयार करून व संस्था परवानगी घेऊन तसेच शासकीय कार्यालयांच्या परवागनी घेऊन महाविद्यालयामध्ये नवीन स्वतंत्र ग्रंथालयासाठी इमारत बांधण्यास व येणाऱ्या खर्चास सभेने परवानगी द्यावी.

**ठराव** :- याबाबत सविस्तर अहवाल तयार करून त्यासाठी लागणारी जागा व खर्च तसेच इतर परवानगी घेण्यासाठी आवश्यक असणारी रक्कम इ. बाबींचा अभ्यास करून पुढील सभेत विषय घेण्यात यावा असे ठरले.

**सूचक** :- **डॉ. सौ. माने एस. व्ही.**
**अनुमोदक** :- **मा. प्रतापराव पवार**
**ठराव सर्वानुमते मंजूर**



Scanned with CamScanner

# कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा

*नियामक मंडळ (गव्हर्निंग बॉडी) सभा क्र १५. दि. २३.०८.२०२५ इतिवृतांत*

**विषय क्र :- ०६. महाविद्यालयातील सेवकांनी सादर केलेल्या विविध अर्जाबाबत चर्चा करणे.**

**टाचन :- खालीलप्रमाणे विविध अर्जाबाबत सविस्तर माहिती सादर.**

१. **Smartgencon 2025 Conference साठी महाविद्यालयातील तीन शिक्षक सेवकांना बाली येथे उपस्थित राहण्यासाठी येणाऱ्या प्रवास खर्चास परवानगी मिळणेसाठी सादर केलेल्या अर्जाबाबत मंजुरी घेणे.**

**टाचण** - महाविद्यालयातील तीन शिक्षकांचा रिसर्च पेपर Smartgencon 2025 Conference इंडोनेशिया, बाली येथे सादर करण्यासाठी निवड झालेली आहे. सादर केलेल्या पेपरच्या सादरीकरणासाठी त्यांना बाली येथे उपस्थित रहाणे आवश्यक आहे. त्यासाठी तीन शिक्षक सेवकांनी एकवेळेच्या प्रवास खर्चासाठी प्रत्येकी २०,०००/- एवढ्या रक्कमेची मागणी केलेली आहे. याबाबत सभेने योग्य मार्गदर्शन करावे.

**प्राचार्य शिफारस** – वरील नुसार Smartgencon 2025 Conference साठी महाविद्यालयातील तीन शिक्षक सेवकांना बाली येथे उपस्थित राहणेसाठी एक वेळेच्या प्रवासासाठी प्रत्येकी २०,०००/- देण्यास शिफारस आहे.

**ठराव** - याबाबत सभेस माहिती दिली त्यानुसार सभेने चर्चा करून Smartgencon 2025 Conference साठी महाविद्यालयातील तीन शिक्षक सेवकांना बाली येथे उपस्थित राहणेसाठी एकवेळेच्या प्रवास खर्चासाठी प्रत्येकी २०,०००/- एवढ्या रक्कमेस परवानगी दिली.

२. **सिव्हील इंजिनिअरिंग या विभागातील विद्यार्थ्यांची दुबई येथे शैक्षणिक सहल काढण्यास परवानगी घेणे.**

महाविद्यालयातील सिव्हील इंजिनिअरिंग या विद्याशाखेत शिकत असलेल्या विद्यार्थ्यांना सिव्हील क्षेत्रातील आधुनिक तंत्रज्ञान बाबींचा अभ्यास करण्यासाठी दुबई येथे शैक्षणिक सहल आयोजित करण्यासाठी परवानगी अर्ज सादर केलेला आहे. दुबई येथे आपल्या महाविद्यालयातील बरेच विद्यार्थी सद्या नोकरी करीत आहेत. तसेच काही विद्यार्थ्यांच्या स्वतःच्या बांधकाम कंपनी आहेत. या सर्व बांधकाम व्यवसाय व नोकरी या बाबींचा अभ्यास व माहिती घेण्यासाठी सिव्हील इंजिनिअरिंग शाखेतील विद्यार्थ्यांना उपयुक्त ठरेल. तरी याबाबत सभेने चर्चा करून सिव्हील इंजिनिअरिंग या विभागातील विद्यार्थ्यांची दुबई येथे संस्था नियमानुसार शैक्षणिक सहल काढण्यास परवानगी मिळावी.

**ठराव** - याबाबत सभेने चर्चा करून महाविद्यालयातील सिव्हील इंजिनिअरिंग या विभागातील विद्यार्थ्यांची दुबई येथे शैक्षणिक सहल काढण्यास संस्था नियमानुसार परवानगी देण्यात आली.



Scanned with CamScanner

३. **Center of Excellence या सेंटर मध्ये सी. एन. सी. ट्रेनर घेणेबाबत.**

महाविद्यालयात स्थापन करण्यात आलेल्या Center of Excellence या सेंटर मध्ये विविध आधुनिक तंत्रज्ञानाच्या मशीन बसविण्यात आलेल्या आहेत. यामध्ये सी.एन.सी मशीन बसविण्यात आली असून ती चालविण्यासाठी स्वतंत्र ऑपरेटरची आवश्यकता आहे. सदर ऑपरेटरची नियुक्ती केल्यास Private Company यांची कामे घेतल्यास महाविद्यालयास आर्थिक मदत होऊ शकते. या दृष्टीकोणातून सदर मशीन चालविण्यासाठी सी. एन. सी. ट्रेनर ची नेमणूक करणे आवश्यक असल्याने याबाबत सभेने चर्चा करून तज्ञ ट्रेनरची नेमणूक करण्यास व त्यास दरमहा ३० ते ३५ हजार मानधन देण्यास परवानगी द्यावी. सध्या महाविद्यालय सी. एन. सी. ट्रेनर चालविण्याबाबतचा एक अर्ज प्राप्त झालेला आहे.

**ठराव** - महाविद्यालयात स्थापन करण्यात आलेल्या Center of Excellence मधील सी.एन.सी. मशीन करिता तज्ञ ट्रेनरची नेमणूक करण्यासाठी सभेस माहिती दिली. त्यानुसार सभेने चर्चा करून महाविद्यालयात प्राप्त झालेल्या उमेदवाराची योग्य माहिती घेऊन सदर मशीन द्वारे मासिक व वार्षिक उत्पन्न किती होऊ शकते याचा अभ्यास करून सी. एन. सी. ट्रेनर म्हणून नेमणूक करण्यास व दरमहा मानधन अदा करण्यास सभेने परवानगी दिली. तसेच सी. एन. सी. ट्रेनर साठी SimuSoft Technologies यांच्या समवेत चर्चा करावी असे सुचविले.

**सूचक :- डॉ. सौ. मोदी शबिना जे.**
**अनुमोदक :- मा. विकास देशमुख साहेब**
**ठराव सर्वानुमते मंजूर**

**विषय क्र :- ०७. महाविद्यालयातील आर्थिक बाबींची मंजुरी घेणे.**

**विषय क्र :- ७.१. महाविद्यालयाच्या मुलांच्या व मुलींच्या वसतिगृहाच्या इमारतीची दुरूस्ती व कलरचे कामकाज करणेबाबत व प्राचार्य बंगलाचे नूतनीकरणाबाबत चर्चा करणे.**

**टाचन :-** महाविद्यालयातील मुलांचे वसतीगृह व मुलींचे वसतीगृहाचा सतत दुरुस्ती खर्च येत आहे तसेच दोन्ही वसतीगृह हे जुन्या इमारतीत असल्यामुळे सततचा दुरुस्तीचा खर्च येत आहे. याबाबत मागील महाविद्यालय नियामक मंडळाची सभा क्र. ११ दि. १९.०८.२०२४ रोजी झालेल्या सभेमधील विषय क्र. १६ नुसार चर्चेसाठी विषय ठेवण्यात आला होता. या विषयामध्ये मुलींच्या वस्तीगृहाचे नूतनीकरण करणेसाठी तज्ञ आर्किटेक्ट यांच्याकडून वसतिगृहाचा Plan तयार करावा व एकूण अंदाजे येणाऱ्या खर्चाचा तपशील तयार करून याकरिता गरज भासल्यास कर्ज घेऊन अथवा निधी उपलब्ध करावा असे सभेने सुचविले होते.



Scanned with CamScanner

सध्या सुरु असलेल्या वसतीगृहाच्या इमारतीच्या खिडक्या, दरवाजे, फरश्या, बाथरूम व टॉयलेट यांची दुरुस्ती करण्यासाठी आर्किटेक्ट यांच्याकडून अंदाजपत्रक तयार करून घेऊन पुढील महाविद्यालय नियामक मंडळा मध्ये खर्चास परवागनी मिळणेबाबत प्रस्ताव ठेवण्यास परवागनी मिळावी.

तसेच महाविद्यालयातील प्राचार्याच्या निवासासाठी पूर्वी बांधण्यात आलेला बंगला दि. रयत को. ऑपरेटीव्ह बँक यांच्या मुख्य कार्यालयासाठी देण्यात आलेला होता. रयत बँकेची नवीन इमारत झाल्याने सदरचा बंगला महाविद्यालयाच्या ताब्यात दिलेला आहे. सदरचा बंगला वापरण्याकरिता बंगल्याचे दुरुस्ती व नूतनीकरण करण्याची आवश्यकता आहे. याबाबत सभेने चर्चा करून नूतनीकरण करण्यास परवानगी द्यावी.

**आर्थिक तरतूद** :- महाविद्यालयाच्या मुलांच्या व मुलींच्या वसतिगृहाच्या इमारतीची दुरूस्ती व कलरचे कामकाज करणेसाठी तसेच प्राचार्य बंगलाचे नूतनीकरण करणेसाठी महाविद्यालयाकडे आर्थिक तरतूद उपलब्ध आहे.

**प्राचार्य शिफारस** :- महाविद्यालयामध्ये प्रवेशित होणाऱ्या विद्यार्थ्यांची दरवर्षी वसतिगृहाची मागणी वाढली असून सध्या असलेली इमारत हि जुनी असल्याने इमारतीस कलर व दुरुस्ती करणे गरजेचे असल्याने त्यास सभेने परवानगी द्यावी. तसेच प्राचार्य बंगला हा बँके कडून महाविद्यालयाच्या ताब्यात मिळाल्याने त्याची दुरुस्ती व नूतनीकरण करण्यास संस्था नियमानुसार परवानगी द्यावी.

**ठराव** - मुलांच्या व मुलींच्या वसतिगृहाच्या इमारतीची दुरूस्ती व कलरचे कामकाज करणेबाबत व प्राचार्य बंगलाचे नूतनीकरणाबाबत चर्चा करून अंदाजपत्रक तयार करून पुढील सभेमध्ये सादर करावे असे सूचित केले.

**सूचक** :- **डॉ. सौ. मोदी एस . जे.**
**अनुमोदक** :- **मा. डॉ. एन. बी. पासलकर**
**ठराव सर्वानुमते मंजूर**

**विषय क्र :- ७.२. Research Policy बाबत चर्चा करून मान्यता घेणे.**

**टाचन** :- महाविद्यालयाने रयत शिक्षण संस्थेच्या Research Policy च्या धोरणानुसार महाविद्यालयाची स्वतंत्र Research Policy तयार केलेली आहे. या Research Policy चा सविस्तर मायना सोबत जोडलेला आहे. या Research Policy बाबत चर्चा करून सभेने मान्यता द्यावी.

**आर्थिक तरतूद** :- महाविद्यालयातील शिक्षक सेवक व विद्यार्थ्यांना संशोधना साठी लागणारा निधी व इतर खर्च महाविद्यालयाकडे उपलब्ध आहे.

**प्राचार्य शिफारस** :- महाविद्यालयातील शिक्षक सेवकांचा व विद्यार्थ्यानाचा संशोधनासाठी अधिक प्रमाणात वाढ होण्यासाठी लागणारा निधी व इतर करावी लागणारी कार्यवाही साठी सभेने चर्चा करून Research Policy च्या तरतुदी नुसार खर्च करण्यास परवानगी द्यावी.



Scanned with CamScanner

**ठराव** - याबाबत सभेने चर्चा करून महाविद्यालयाच्या नियामक मंडळातील सर्व सन्मानीय सदस्य यांना Research Policy कळविण्यात यावी व त्यांचे मत घेऊन पुढील कार्यवाही करावी असे सभेने सुचविले आहे. त्यानुसार महाविद्यालयातील Research Policy बद्दल महाविद्यालयाच्या नियामक मंडळाचे सन्मानीय सदस्य मा. उदय जाधव यांनी त्यास परवानगी दिलेली आहे.

**सूचक** :- **डॉ. सौ. मोदी एस. जे.**
**अनुमोदक** :- **मा. प्रतापराव पवार**
**ठराव सर्वानुमते मंजूर**

**विषय क्र :-७.३. Electrical Vehicle लॅब ची स्थापना करण्यासाठी चर्चा करणे व मंजुरी घेणे.**

**टाचन** :- महाविद्यालयात Electrical Vehicle लॅब स्थापन करणेसाठी महाविद्यालयातील एकूण चार शिक्षक सेवकांना Electromotion E-Vidyut Vehicles Pvt. Ltd., Pune या कंपनीस भेट देण्यास व माहिती घेण्यास दि. २९.०७.२०२५ रोजी प्रतिनियुक्त करण्यात आले होते. त्यानुसार सदर सेवकांनी कंपनीला भेट देऊन Electrical Vehicle लॅब स्थापन करण्यासाठी व लॅब चा विद्यार्थ्यांना त्याचा कशा पद्धतीने भविष्यात शैक्षणिक व नोकरीच्या दृष्टीने फायदा होईल याचा अहवाल सादर केलेला.

महाविद्यालयात Electrical Vehicle लॅब स्थापन करणेसाठी ९०० sq जागा आवश्यक असून त्यासाठी अंदाजे १७.३० लाख एवढा खर्च अपेक्षित आहे. तरी याबाबत सभेने चर्चा करून मार्गदर्शन करावे.

**आर्थिक तरतूद** :- महाविद्यालयात Electrical Vehicle लॅब स्थापन करण्यासाठी येणाऱ्या खर्चाची आर्थिक तरतूद महाविद्यालयाकडे उपलब्ध आहे. तसेच या लॅब मार्फत विद्यार्थ्यांना विविध प्रकारचे प्रोजेक्ट तयार करण्यास मदत होणार आहे.

**प्राचार्य शिफारस** :- वरील नुसार महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना इलेक्ट्रिक साधनाचा वापर करून नवीन प्रोजेक्ट तयार करणेसाठी महाविद्यालयात अत्याधुनिक इलेक्ट्रिकल लॅब असणे आवश्यक आहे. त्यामुळे Electrical Vehicle लॅब महाविद्यालयात स्थापन करण्यास व येणाऱ्या खर्चास सभेची परवानगी मिळावी.

**ठराव** - सदर लॅब ची स्थापना करण्यासाठी सभेमध्ये चर्चा करण्यात आली, त्यामध्ये मा. प्रतापराव पवार साहेब यांनी Electrical Vehicle चे वापर सध्या कमी होत असल्याचे सूचित केले. त्यानुसार याबाबत सविस्तर माहिती घ्यावी व तदनंतर Electrical Vehicle लॅब स्थापन करण्याबाबत विचार करण्यात येईल असे सभेने सुचविले.

**सूचक** :- **डॉ. सौ. माने एस. व्ही.**
**अनुमोदक** :- **मा. प्रतापराव पवार**
**ठराव सर्वानुमते मंजूर**



Scanned with CamScanner

# कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा

*नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) सभा क्र १५. दि. २३.०८.२०२५ इतिवृतांत*

**विषय क्र :- ७.४. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील शिक्षक व शिक्षकेत्तर सेवकांच्या पगारास व मानधनास परवानगी घेणेबाबत.**

**टाचन :-** महाविद्यालयातील रिक्त असणारी शिक्षक सेवकांची पदे ADHOC हंगामी तत्वावर व शिक्षकेत्तर सेवकांची रिक्त असणारी पदे रोजंदारी तत्वावर आवश्यकतेनुसार दरवर्षी महाविद्यालय नियामक मंडळाची व संस्थेची परवानगीने घेऊन भरली जातात. त्यानुसार शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता संस्थेमार्फत विहित नमुन्यात जाहिरात देऊन शिक्षक सेवकांची पदे मुलाखती घेऊन हंगामी तत्वावर (Adhoc) भरण्यात आलेली आहेत. या भरण्यात आलेल्या शिक्षकांचा मागील वर्षातील Performance, संबधित विभागप्रमुखांनी दिलेला गोपनीय अहवाल व संबधित शिक्षकाने पगाराची केलेली मागणी या सर्व बाबींचा विचार करून पगार ठरविण्यात आलेला आहे. याच पद्धतीने रोजंदारी तत्वावर कामकाज करत असलेल्या सेवकांचा पगार ठरविण्यात आलेला आहे. याबाबतची सविस्तर माहिती सोबत जोडलेली आहे.

**आर्थिक तरतूद :-** शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता ADHOC स्वरुपात नेमणूक केलेल्या शिक्षक सेवकांना व रोजंदारी तत्वावर कामकाज करीत असलेल्या सेवकांना दरमहा वेतन / मानधन देण्यास महाविद्यालयाकडे आर्थिक तरतूद आहे.

**प्राचार्य शिफारस :-** महाविद्यालयात शिक्षक सेवकांची रिक्त पदे असल्याने दरवर्षी संस्था नियमानुसार महाविद्यालयात विविध विभागात रिक्त असलेल्या शिक्षक सेवकांची adhoc स्वरुपात नेमणूक करण्यात येते. सदर नेमणूक केलेल्या शिक्षक सेवकांचा शैक्षणिक कामकाजाचा आढावा घेऊन व विभागप्रमुखांच्या कडून गोपनीय अहवाल घेऊन त्यांच्या वेतनामध्ये दरवर्षी वाढ केली जाते. त्यानुसार शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये नेमणूक केलेल्या adhoc शिक्षकसेवकांना दरमहा वेतन देण्याचा तपशील तयार करण्यात आला असून त्यास सभेने चर्चा करून दरमहा वेतन देण्यास परवानगी द्यावी. तसेच महाविद्यालयात रिक्त असलेले शिक्षकेत्तर सेवकांच्या पदावर रोजंदारी Daily Wages स्वरुपात सेवकांची नेमणूक केली आहे. सदर सेवकांच्या कामकाजानुसार त्यांचे मानधन ठरविण्यात आले आहे. त्यास सभेने चर्चा करून दरमहा मानधन देण्यास परवानगी द्यावी.

**ठराव -** महाविद्यालयातील शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील शिक्षक व शिक्षकेत्तर सेवकांच्या पगारास व मानधन अदा करणेबाबत सभेत याबाबत चर्चा करण्यात आली. त्यानुसार मा. प्रतापराव पवार साहेब यांनी हा विषय मा. डॉ. एन. बी पासलकर साहेब यांच्या अखत्यारीतला आहे असे सांगितले व पगार वाढीबाबतचा सविस्तर अहवाल तयार करून मा. सचिव, रयत शिक्षण संस्था सातारा यांच्याशी चर्चा करून पुढील सभेमध्ये विषय ठेवण्यात यावा असे सांगितले.

**सूचक** :- **डॉ. सौ. माने एस. व्ही.**
**अनुमोदक** :- **मा. डॉ. एन. बी. पासलकर**
**ठराव सर्वानुमते मंजूर**



Scanned with CamScanner

# कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा

*नियामक मंडळ (गव्हर्निंग बॉडी) सभा क्र १५. दि. २३.०८.२०२५ इतिवृतांत*

**विषय क्र :- ७.५. संस्था डीलर कडून महाविद्यालयात सोलार पॅनल बसविण्यास व येणाऱ्या खर्चास परवानगी मिळणेबाबत.**

**टाचन** :- NAAC कमिटीच्या अनुषंगाने महाविद्यालयात सोलार पॅनल बसविण्यासाठी महाविद्यालय नियामक मंडळाची सभा क्र. ११ दि. १९.०८.२०२४ रोजी झालेल्या सभेतील विषय क्र. १७.१० नुसार सदर विषय चर्चेसाठी ठेवण्यात आला होता. याबाबत सभेने चर्चा करून सोलर पनल बसविण्यासाठी नामांकित व उत्कृष्ट कंपनी यांच्याशी संपर्क साधून संबधित कंपनीसोबत BOT तत्त्वावर सोलार पॅनल बसविण्यासाठी आवश्यक असणाऱ्या सर्व बाबींची माहिती व पुढील कार्यवाही करावी असे सूचित करण्यात आले होते. त्यानुसार सोलार पॅनल बसविण्यासाठी महाविद्यालयातील डॉ. आलदर दिलीप एस. यांना जबाबदारी देण्यात आली होती. परंतु आज अखेर पर्यंत सदर कामकाज पूर्ण झालेले नाही.

तरी शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये NAAC कमिटी महाविद्यालयात भेट देण्याची शक्यता असल्याने रयत शिक्षण संस्थेने निर्धारित केलेला डीलर कडून महविद्यालयात सोलार पॅनल बसविण्यास व येणाऱ्या खर्चास सभेची परवानगी मिळावी.

**आर्थिक तरतूद** :- महाविद्यालयात सोलार पॅनल बसविण्यासाठी येणाऱ्या आर्थिक खर्च महाविद्यालयाकडे उपलब्ध असून त्यासाठी लागणारी आवश्यक जागा देखील उपलब्ध आहे.

**प्राचार्य शिफारस** :- महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये NAAC कमिटी महाविद्यालयात भेट देण्यात येणार असल्याने NAAC च्या निर्देशनानुसार महाविद्यालयात सोलार पॅनल सिस्टीम असणे आवश्यक आहे. त्यानुसार महाविद्यालयात 65KV सोलार पॅनल सिस्टीम बसविण्यास व येणाऱ्या खर्चास सभेने परवानगी द्यावी.

**ठराव** - महाविद्यालयात सोलार पॅनल बसविण्यासाठी सभेने चर्चा करून संस्था डीलर कडून सोलार पॅनल बसविण्यास व येणाऱ्या खर्चास परवानगी दिली.

**सूचक** :- **डॉ. सौ. माने एस. व्ही.**
**अनुमोदक** :- **मा. डॉ. एन. बी. पासलकर**
**ठराव सर्वानुमते मंजूर**



Scanned with CamScanner

# कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा

*नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) सभा क्र १५. दि. २३.०८.२०२५ इतिवृतांत*

**विषय क्र :- ७.६. EduSkills Connect मार्फत आयोजित केलेल्या Eduskill Connect 2025 & Eduskill HR Summit साठी उपस्थित राहण्यासाठी येणाऱ्या खर्चास परवानगी मिळणे बाबत.**

**टाचन** :-महाविद्यालयाने AICTE संबधित असणाऱ्या EduSkills कंपनी सोबत सामंजस्य करार केलेला आहे. या करारा नुसार EduSkills कंपनी मार्फत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना मोफत ऑनलाईन इंटरशिप दिली जाते. या कंपनीने या वर्ष शिमला येथे Eduskill Connect 2025 & Eduskill HR Summit चे आयोजन केलेले आहे. सदरचे रजिस्ट्रेशन फी १० हजार रु. इतकी आहे. सदर रजिस्ट्रेशन फी भरण्यात आलेली आहे. तसेच या सभेस जाण्यास अंदाजे रु. १५ ते २० हजार इतका खर्च अपेक्षित आहे. या Summit साठी महाविद्यालयाचे प्राचार्य उपस्थित राहणार आहेत. तरी या खर्चास सभेने परवानगी द्यावी.

**प्राचार्य शिफारस** :- सभेने प्राचार्यांना Eduskill Connect 2025 & Eduskill HR Summit साठी उपस्थित राहण्यासाठी व येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास परवानगी द्यावी.

**ठराव** - याबाबत सभेने चर्चा करून EduSkills कंपनी मार्फत शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता शिमला येथे आयोजन केलेल्या Eduskill Connect 2025 & Eduskill HR Summit साठी उपस्थित राहण्यास व येणाऱ्या खर्चास सभेने परवानगी दिली.

**सूचक :- डॉ. सौ. मोदी एस. जे.**
**अनुमोदक :- मा. डॉ. एन. बी. पासलकर**
**ठराव सर्वानुमते मंजूर**

**विषय क्र :- ७.७. कु. प्रथा देवकर हिची शैक्षणिक फी माफ होणेबाबत आलेल्या अर्जाबाबत चर्चा करणे.**

**टाचन** :- कु. प्रथा देवकर या विद्यार्थिनीने शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये महाविद्यालयात कॉम्प्युटर सायन्स अनड इंजिनिअरिंग या विभागात प्रथम वर्षात प्रवेश घेतला होता. तसेच सध्या शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये द्वितीय वर्षात प्रवेश घेण्यासाठी लागणारी फी माफ होण्यासाठी मा. आ. शशिकांत शिंदे, सदस्य, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र राज्य यांचे शिफारस पत्र महाविद्यालयास सादर केलेले आहे. सदर पत्रामध्ये नमूद केल्या नुसार कु. प्रथा देवकर हिची घरची परिस्थिती अतिशय गरिबीची असून तिची संपूर्ण फी माफ करण्याबाबत शिफारस केलेली आहे. सदर विद्यार्थिनीची प्रथम वर्षाची वार्षिक फी १,१५,०००/- व द्वितीय वर्षाची १,१५,०००/- अशी एकूण २,३०,०००/- इतकी फी आहे. यापैकी रु. ६०,०००/- फी विद्यार्थिनीने भरली आहे शिल्लक फी रु. १,७०,०००/- इतकी आहे. तरी याबाबत सभेने चर्चा करून योग्य मार्गदर्शन करावे.

**प्राचार्य शिफारस** :- वरील नुसार कु. प्रथा देवकर या विद्यार्थिनीने फी माफ करण्यासाठी शिफारस केलेल्या पत्राबाबत सभेने चर्चा करून फी सवलत देण्यासाठी योग्य मार्गदर्शन करावे.



Scanned with CamScanner

**ठराव -** सभेने चर्चा करून अशा प्रकारे फी माफ करता येणार नाही भविष्यात अशा प्रकारचे विविध अर्ज येऊ शकतात त्यामुळे कोणालाही फी माफ करू नये असे सभेने सुचविले.

**सूचक** :- **डॉ. सौ. मोदी शविना जे.**
**अनुमोदक** :- **मा. प्रतापराव पवार**
**ठराव सर्वानुमते मंजूर**

**विषय क्र :- ०८. महाविद्यालयातील शिक्षकेत्तर सेवकांना अकरा महिन्याचे नेमणूक आदेश देण्याबाबत चर्चा करणे.**

**टाचन** :- महाविद्यालयात सध्या कार्यरत असलेले कायम शिक्षकेत्तर सेवक हे नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होत आहेत. त्यामुळे महाविद्यालयातील प्रशासकीय कामकाज करणेस अतिशय जिकीरीचे होत आहे. महाविद्यालयाच्या विविध विभागातील व कार्यालयातील माहिती जतन करणे व विविध शिखर संस्थांना माहिती सादर करणेसाठी महाविद्यालयाच्या व संस्थेच्या उद्देशाने कायमस्वरूपी व जबाबदारी सेवक असणे आवश्यक आहे. तसेच सध्या सेवानिवृत्त झालेल्या सेवकांच्या जागी कामकाज करण्यासाठी रोजंदारी (Daily Wages) तत्वावर काही शिक्षकेत्तर सेवक कामकाज करत आहेत. सदर सेवकांना ज्बाबी देण्यासाठी नेमणूक आदेश देणे अत्यंत आवश्यक आहे. खालील तक्त्यानुसार महाविद्यालयाच्या कार्यालयातील व विभागातील शिक्षकेत्तर सेवकांची अकरा महिन्याचे नेमणूक आदेश मिळावेत.

तसेच अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली (AICTE), NAAC, NBA, फी नियामक मंडळ (FRA) या शिखर संस्थांची मान्यता मिळविण्यासाठी त्यांच्या नियमानुसार शिक्षकेत्तर सेवकांची निश्चित संख्या असणे आवश्यक आहे. परंतु सध्या रोजंदारी तत्वावर कार्यरत असलेल्या सेवकांची माहिती या शिखर संस्थाना सादर करता येत नसल्याने मान्यता घेणे जिकीरीचे होत आहे.

**शिक्षकेत्तर सेवकांचा रिक्त पद तपशील**

| अ.क्र. | पद | आवश्यक असणारी संख्या | सद्या कार्यरत असलेली संख्या | रिक्त असलेली संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | वरिष्ठ लिपिक | ४ | ० | ४ |
| २ | कनिष्ट लिपिक | ८ | ३ | ५ |
| ३ | अकौंट लिपिक | २ | ० | २ |
| ४ | भांडारपाल | १ | ० | १ |
| ५ | ग्रंथालय लिपिक | ३ | १ | २ |
| ६ | तांत्रिक प्रयोगशाळा सहाय्यक | २८ | ६ | २२ |
| | **एकूण** | **५०** | **१०** | **४०** |



Scanned with CamScanner

# कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा

*नियामक मंडळ (गव्हर्निंग बॉडी) सभा क्र १५. दि. २३.०८.२०२५ इतिवृतांत*

**सध्या महाविद्यालयात रोजंदारी तत्वावर कामकाज करीत असलेल्या शिक्षकेत्तर सेवकांची माहिती**

| अ.क्र. | पद | संख्या |
|---|---|---|
| १ | वरिष्ठ लिपिक | ० |
| २ | कनिष्ट लिपिक | ७ |
| ३ | अकौंटं लिपिक | १ |
| ४ | भांडारपाल | ० |
| ५ | ग्रंथालय लिपिक | २ |
| ६ | तांत्रिक प्रयोगशाळा सहाय्यक | ९ |
| ७ | वर्कशॉप | ३ |
| ८ | इलेक्ट्रिकल | १ |
| **एकूण** | | **२३** |

**आर्थिक तरतूद** :- वरील तक्त्यानुसार नेमणूक करण्यात येणाऱ्या शिक्षकेत्तर सेवकांना दरमहा पगार / मानधन देण्यासाठी महाविद्यालयाकडे आर्थिक तरतूद आहे.

**प्राचार्य शिफारस** :- महाविद्यालयातीच्या कार्यालयातील व विभागातील प्रशासकीय कामकाज करणेसाठी सध्या शिक्षकेत्तर संख्या कमी असल्याने तातडीने माहिती सादर करणे अतिशय जिकीरीचे होत आहे. तसेच विभागातील व प्रशाकीय बाबींच्या कामकाजाची जबाबदारी देणे देखील जिकीरीचे होत आहे. तरी वरील तक्त्यानुसार रिक्त असलेल्या शिक्षकेत्तर सेवकांना अकरा महिन्याचे नेमणूक आदेश मिळावे व दरमहा वेतन अदा करण्यास सभेची परवानगी मिळावी.

**ठराव** - महाविद्यालयात रिक्त असलेल्या शिक्षकेत्तर सेवकांना अकरा महिन्याचे नेमणूक आदेश मिळण्यासाठी मा. प्राचार्य यांनी माहिती दिली याबाबत सभेने चर्चा करून संस्था स्तरावर विचार विनिमय करून निर्णय घेण्यात यावा असे सभेने सुचविले.

**सूचक** :- **डॉ. सौ. मोदी एस. जे.**
**अनुमोदक** :- **मा. आ. दिलीप वळसे पाटील**
**ठराव सर्वानुमते मंजूर**



Scanned with CamScanner

# कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा

*नियामक मंडळ (गव्हर्निंग बॉडी) सभा क्र १५. दि. २३.०८.२०२५ इतिवृतांत*

**विषय क्र.९ :- मा. चेअरमन यांचे परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयावर चर्चा करणे.**

**विषय क्र. ९.१. VEETRAG Computers Pvt. Ltd. यांच्या कडून प्राप्त झालेल्या बिलाची रक्कम अदा करण्यास परवानगी मिळणेबाबत.**

**टाचन** :-आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये महाविद्यालयात VEETRAG Computers Pvt. Ltd. या विक्रेता धारकाकडून 86" Display Pannel दि. २२.०३.२०२५ च्या बिलानुसार खरेदी केलेला आहे. सदर बिल महाविद्यालयास दि. २२.०७.२०२५ रोजी प्राप्त झालेले आहे. प्राप्त झालेल्या बिलाची रक्कम १,४७,२००/- इतकी आहे. सदर बिल उशिरा प्राप्त झाल्यामुळे चालू आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये खर्ची टाकण्यास सभेची परवानगी मिळावी.

**आर्थिक तरतूद** : वरील बिलाची रक्कम अदा करण्यास महाविद्यालयाकडे आर्थिक तरतूद आहे.

**प्राचार्य शिफारस** : VEETRAG Computers Pvt. Ltd. या विक्रेता धारकाकडून खरेदी केलेल्या 86" Display Pannel च्या बिलाची रक्कम चालू आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये खर्ची टाकण्यास सभेने परवानगी द्यावी.

**ठराव** :- याबाबत सभेने चर्चा करून VEETRAG Computers Pvt. Ltd यांच्याकडून प्राप्त झालेले बिल चालू आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्येखर्ची टाकण्यास सभेने परवानगी दिली.

**सूचक** :- **मा. दिलीप वळसे पाटील**
**अनुमोदक** :- **डॉ. सौ. मोदी एस. जे.**
**ठराव सर्वानुमते मंजूर**

**विषय क्र. ९.२ दिल्ली येथे आयोजित केलेल्या Conference साठी सिव्हील विभागातील पाच विद्यार्थ्यांची रजिस्ट्रेशन फी अदा करण्यास परवानगी घेणे.**

**टाचन** :- महाविद्यालयातील सिव्हील इंजिनिअरिंग या विभागातील अंतिम वर्षात शिकत असलेले पाच विद्यार्थी "Aqua Congress 2024" या Conference साठी उपस्थित राहणेसाठी नवी दिल्ली येथे दि. १८.११.२०२४ ते दि. १९.११.२०२४ रोजी गेले होते. सदर Conference साठी मा. प्राचार्य यांनी रक्कम रु. १०,०००/- रजिस्ट्रेशन फी देण्यास मंजुरी दिली होती. सदर रजिस्ट्रेशन फी विद्यार्थ्यांनी दि. १८.१०.२०२४ रोजी "Aqua Congress 2024" यांना जमा केली होती. त्याचा हिशोब महाविद्यायाच्या लेखा विभागात दि. २०.०८.२०२५ रोजी सादर केलेला आहे. सदर Conference चा हिशोब उशिरा प्राप्त झाल्यामुळे चालू आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये खर्ची टाकण्यास सभेची परवानगी मिळावी.

**आर्थिक तरतूद** : सदर Conference ची रजिस्ट्रेशन फी ची रक्कम अदा करण्यास महाविद्यालयाकडे आर्थिक तरतूद आहे.

**प्राचार्य शिफारस** : "Aqua Congress 2024" या Conference साठी विद्यार्थ्यांनी जमा केलेली रजिस्ट्रेशन फी चालू आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये खर्ची टाकण्यास सभेने परवानगी द्यावी.

**ठराव** :- याबाबत सभेने चर्चा करून सिव्हील इंजिनिअरिंग या विभागातील अंतिम वर्षात शिकत असलेले पाच विद्यार्थी "Aqua Congress 2024" या Conference साठी लागणारी रजिस्ट्रेशन फी चालू आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये खर्ची टाकण्यास सभेने परवानगी दिली.

कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय सातारा



Scanned with CamScanner

# कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा



सूचक :- मा. प्रतापराव पवार
अनुमोदक :- डॉ. सौ. माने एस. व्ही.
ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्र. ९.३. श्री. पडवळ संदेश बळीराम लेखापाल यांच्या मागील संस्थेतील वेतनश्रेणी संरक्षित करून लागू करणेस परवानगी मिळणेबाबत.**

**टाचण** :- महाविद्यालयातील श्री. पडवळ संदेश बळीराम लेखापाल Accountant हे दि. ०३.०५.२०१८ पासून लेखापाल या पदावर कार्यरत आहेत. श्री. पडवळ यांना या शाखेमध्ये रुजू होण्यापूर्वी मागील संस्थेमध्ये लेखापाल या पदाच्या वेतनश्रेणीनुसार ९३००-३४८००+४३०० AGP वेतन मिळत होते परंतु या महाविद्यालयामध्ये रुजू झाल्यापासून वरिष्ठ लिपिकाची वेतनश्रेणी ५२००-२०४००+२४०० AGP या वेतनश्रेणीनुसार जादा १६ वेतनवाढी देऊन मागील वेतन सरंक्षित केले आहे. सदर सेवकाला सद्य बेसिक वेतन १२,२८० व AGP २४०० आहे. लेखापाल पदाची वेतनश्रेणी हि ९३००-३४८००+४३००AGP असून सदरची वेतनश्रेणी बदलून मिळणेबाबत श्री. पडवळ संदेश बी. यांनी विनंती अर्ज महाविद्यालयात सादर केलेला आहे.

सदरचा विनंती अर्ज महाविद्यालयातील नियामक मंडळाची सभा क्र. ११. दि. १९.०८.२०२४ रोजी झालेल्या सभेमध्ये विषय ठेवण्यात आलेला होता. याबाबत सभेने चर्चा करून लेखापाल या पदाच्या वेतनश्रेणीनुसार नेमणूक तारखेपासून वेतन श्रेणी ९३००-३४८००+४३०० AGP प्रमाणे निश्चित करणेसाठी संस्था कार्यालयास पत्रव्यवहार करावा व लेखापाल या पदाची वेतनश्रेणी तपासून संस्था आदेशानुसार कार्यवाही करावी असे सूचित केले होते. त्यानुसार श्री. पडवळ यांच्या लेखापाल पदाची वेतनश्रेणीबाबतचा प्रस्ताव तयार करून आवश्यक कागदपत्रे जोडून संस्था कार्यालयास दि. ०६.०९.२०२४ रोजीच्या पत्राने सादर केला होता.

परंतु सदर प्रस्तावाला मंजुरी मिळालेली नसल्याने सदर प्रस्ताव दुसऱ्यांदा महाविद्यालय नियामक मंडळाची सभा क्र. १२, दि. १८.०२.२०२५ रोजी झालेल्या सभेमधील विषय क्र. १०.२ नुसार ठेवण्यात आला होता. याबाबत सभेने चर्चा करून मा. सचिव, रयत शिक्षण संस्था यांच्या समवेत चर्चा करून याबाबतचा संस्था कार्यालयास पाठपुरावा करावा असे सूचित केले. त्यानुसार पुनश्चः संस्था कार्यालयास पत्रव्यवहार करून व मा. सचिव साहेब यांच्या समवेत चर्चा करून देखील सदरचा प्रस्ताव अद्यापही मंजूर झालेला नाही.

वरील नुसार महाविद्यालय नियामक मंडळाच्या दोन्ही सभेच्या मंजुरी असून देखील सदरचा प्रस्ताव अद्याप प्रलंबित असल्याने सदरच्या प्रस्तावाबाबत सभेने योग्य मार्गदर्शन करून योग्य तो निर्णय घ्यावा.

**प्राचार्य शिफारस** :- लेखापाल पदाची वेतनश्रेणी हि ९३००-३४८००+४३०० AGP असून त्यामुळे त्यांच्या वेतनामध्ये दरमहा ७००० ते ८००० एवढा फरक पडणार असून सदरची आर्थिक तरतूद महाविद्यालयाकडे आहे तरी सदर लेखापाल पदाची वेतनश्रेणी श्री. पडवळ संदेश बळीराम यांना देण्यात यावी. तसेच महाविद्यालयामध्ये लेखापाल हे एकाकी पद असून सध्याची विद्यार्थी संख्या पाहता लेखाविभागात कामकाज फार मोठ्या प्रमाणात वाढलेले असल्याने श्री पडवळ हे



Scanned with CamScanner

जबाबदारीने कामकाज करीत आहेत व संस्था, CA यांचे लेखा परीक्षण चे व्यवस्थितरित्या पार पाडीत आहेत.

**ठराव** :- सदर विषयाबाबत प्राचार्य यांनी सभेस माहिती दिली त्यानुसार सभेने चर्चा करून श्री. पडवळ संदेश बळीराम यांना लेखापाल या पदाची वेतनश्रेणी ९३००-३४८००+४३०० AGP लागू करण्यास सभेने शिफारस दिली. त्यानुसार संस्था स्तरावर पत्रव्यवहार करून पुढील कार्यवाही करावी असे सभेने सूचित केले.

**सूचक** :- **मा. दिलीप वळसे पाटील**
**अनुमोदक** :- **डॉ. सौ. मोदी एस. जे.**
**ठराव सर्वानुमते मंजूर**

**प्राचार्य तथा सचिव**
नियामक मंडळ (गव्हर्निंग बॉडी)
कर्मवीर भाऊराव पाटील
अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा



Scanned with CamScanner